मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दहा क्षेत्रीय कार्यालयांवर आता तीन-तीन स्वीकृत सदस्य नियुक्तीचा 'फॉर्मूला'..

## भाजपच्या 30 कार्यकर्त्यांना मिळणार नेतृत्वाची संधी, क्षेत्रीय समित्यांवरील नियुक्त्यांसाठी भाजपमध्ये मोर्चेबांधणी सुरू...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासनाला अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि नागरिकांसाठी सुलभ करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन करण्यात आलेल्या दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भाजपच्या ३० कार्यकर्त्यांना राजकीय संधी उपलब्ध होणार आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी तीन स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार असून, त्यासाठी इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये आतापासूनच चुरस निर्माण झाली आहे.



महापालिकेच्या नव्या प्रशासकीय रचनेनुसार रहाटणी, निगडी, भोसरी, चिंचवड, तळवडे, प्राधिकरण, थेरगाव, आकुर्डी, सांगवी आणि मोशी या भागांमध्ये क्षेत्रीय कार्यालयांची विभागणी करण्यात आली असून, आज (बुधवार) पासून ही सर्व दहा कार्यालये कार्यान्वित होत आहेत.

दरम्यान, नव्या धोरणानुसार सर्व क्षेत्रीय समिती अध्यक्षांना महापालिकेकडून इलेक्ट्रिक वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महापालिकेने पर्यावरणपूरक धोरण स्वीकारत भविष्यात केवळ इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी वाहन खरेदीस स्थायी समितीची मंजुरीदेखील मिळाली आहे. महापालिकेच्या सर्व दहा क्षेत्रीय समित्यांच्या अध्यक्षपदी भाजपचे नगरसेवक विराजमान होणार असून, आगामी पंधरवड्यात या नियुक्त्यांची राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे

महापालिकेतील स्वीकृत सदस्य नियुक्तीचा विषय सध्या दप्तरी दाखल असला, तरी नव्या क्षेत्रीय समित्यांमुळे इच्छुक कार्यकर्त्यांसाठी स्थानिक पातळीवर नेतृत्वाची नवी संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात या नियुक्त्यांकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासनाला अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि नागरिकांसाठी सुलभ करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन करण्यात आलेल्या दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भाजपच्या ३० कार्यकर्त्यांना राजकीय संधी उपलब्ध होणार आहे.

### ३० कार्यकर्त्यांना संधी मिळणार...

» सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले की, क्षेत्रीय समिती अध्यक्षपदांची निवड प्रक्रिया येत्या १५ जुलैपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय समितीवर तीन स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, त्याद्वारे भाजपच्या एकूण ३० कार्यकर्त्यांना संधी मिळणार आहे. या पदांसाठी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत वास्तव्यास असलेली व्यक्ती पात्र ठरणार असल्याने इच्छुकांनी पक्ष संघटनेत मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शहराध्यक्ष, आमदार आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांशी संपर्क वाढवून आपली दावेदारी मजबूत करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले.

---

# तिसऱ्या-चौथ्या ट्रॅकच्या अहवालातील त्रुटी तत्काळ दुरुस्त करा...

## खासदार श्रीरंग बारणे यांची रेल्वे बोर्डाच्या निदेशकांकडे मागणी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकबाबत मध्य रेल्वेने काही त्रुटी काढल्या आहेत. हा प्रस्ताव पुन्हा रेल्वे बोर्डाकडे आला आहे. त्यामुळे रेल्वे बोर्डाने त्रुटी तत्काळ दूर कराव्यात. परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे बोर्डाच्या निदेशकांकडे केली.



खासदार बारणे यांनी रेल्वे बोर्डाचे निदेशक फखरुद्दीन अली अहमद यांची भेट घेतली. त्यांना याबाबतचे सविस्तर निवेदन दिले. सध्या पुणे-लोणावळा लोकलच्या दिवसभरात ६०.५९ किलोमीटर अंतर कापत दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करीत ४४ फेऱ्या होतात. या मार्गावर असणारा लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा ताण लक्षात घेता उपनगरीय सेवेसाठी स्वतंत्र मार्गाची अनेक वर्षांपासून खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून मागणी केली जात होती. त्यानुसार त्यांचा केंद्र, राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्यांच्याच प्रयत्नातून या मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी २०१७ मध्ये मान्यता मिळाली आहे. पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत सादर करण्यात आलेल्या पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकच्या या प्रकल्पाचा एकूण खर्च पाच हजार १०० कोटी रुपये आहे. त्यामध्ये जमीन अधिग्रहण खर्चाचाही समावेश आहे. यातील ५०.५० टक्के आर्थिक सहभागाची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य शासन उचलणार आहे. राज्य शासनाचा एकूण वाटा दोन हजार ५५० कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, पुणे-लोणावळा तिसऱ्या, चौथ्या ट्रॅकला मान्यता मिळाली आहे. मध्य रेल्वेने त्यात काही त्रुटी काढल्या आहेत. प्रस्ताव पुन्हा रेल्वे बोर्डाकडे आला आहे. रेल्वे बोर्डाची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव निती आयोगाकडे जाईल. त्यानंतर केंद्राकडून मान्यता मिळेल. त्यामुळे रेल्वे बोर्डाने तातडीने त्रुटींची दुरुस्ती करावी. परिपूर्ण प्रस्ताव तातडीने द्यावा. हा प्रस्ताव निधीसाठी निती आयोगाकडे जाईल. त्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता मिळेल. त्यानंतर कामाला प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. या प्रक्रियेला चार ते पाच महिन्यांचा कालावधी जाईल. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना या प्रकल्पाला गती मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी निधीची तरतूद करुन ठेवली आहे.

# “नमामी इंद्रायणी” नदी सुधार प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी..!

## आमदार महेश लांडगे यांच्या ‘व्हीजन’मधील आणखी एक प्रकल्प दृष्टीक्षेपात...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरणीय विकासाला आणि इंद्रायणी नदीच्या पुनरुज्जीवनाला मोठी चालना देणाऱ्या महत्त्वाकांक्षी इंद्रायणी वॉटर बॉडी सर्वांगीण पुनरुज्जीवन प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे. केंद्र सरकारच्या अमृत 2.0 योजनेअंतर्गत सुमारे 430.75 कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे इंद्रायणी नदीचे प्रदूषण कमी करणे, जलगुणवत्ता सुधारणे, नदीकाठाचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि नागरिकांसाठी पर्यावरणपूरक नदीकिनारा विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी तीन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यानंतर आर्थिक छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत मे. एल.सी. इन्फ्रा प्रा. लि. या कंपनीची सुधारित निविदा सर्वात लाभदायक ठरली असून, अंदाजित खर्चापेक्षा सुमारे तीन टक्के कमी दराने काम करण्याची तयारी कंपनीने दर्शविली आहे. त्यामुळे महापालिकेच्या निधीची बचत होण्यासह गुणवत्तापूर्ण कामाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या प्रकल्पाला केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिका हिस्सा सुमारे 526 कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर निविदा प्रक्रियेत अंतिम झालेली 430 कोटी 75 लाख 61 हजार 777 रुपयांची निविदा स्थायी समितीने मंजूर केली आहे. या रकमेमध्ये रॉयल्टी तसेच मटेरियल टेस्टिंग शुल्काचाही समावेश असून, प्रकल्पाची कामकाजाची मुदत 36 महिने निश्चित करण्यात आली आहे. तसेच, इंद्रायणी नदी पात्रालगत 60 MLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

विशेष म्हणजे, स्थायी समितीमध्ये एकूण 16 सदस्य आहेत. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संदीप वाघेरे आणि शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी विरोध केला. त्याचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात आला.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर इंद्रायणी नदीचे नैसर्गिक स्वरूप जपणे, नदीपात्रातील गाळ आणि प्रदूषण कमी करणे, नदीकाठाचे सुशोभीकरण, हरित क्षेत्र विकसित करणे, पादचारी सुविधा निर्माण करणे तसेच पर्यावरणपूरक नागरी विकासाला चालना देणे शक्य होणार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक नदीकिनाऱ्याचा लाभ मिळण्याबरोबरच भविष्यातील शाश्वत विकासालाही बळ मिळणार आहे. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर आता प्रशासकीय औपचारिकता पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होण्याची शक्यता असून, पिंपरी-चिंचवडच्या पर्यावरणीय इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

> “इंद्रायणी नदी ही पिंपरी-चिंचवड शहराची पर्यावरणीय जीवनरेखा आहे. तिचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही केवळ विकासाची बाब नसून, भावी पिढ्यांप्रती आपली जबाबदारी आहे. अमृत 2.0 अंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला स्थायी समितीने मंजुरी दिल्यामुळे नदीचे प्रदूषण कमी होईल, पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल आणि नागरिकांना स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक नदीकिनारा उपलब्ध होईल. हा प्रकल्प शहराच्या शाश्वत विकासासाठी मैलाचा दगड ठरेल. दर्जेदार आणि वेळेत काम पूर्ण करण्यासाठी स्थायी समिती कटिबद्ध आहे.””
>
> **- अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती.**

> इंद्रायणी नदी ही आपल्या सांस्कृतिक, धार्मिक आणि पर्यावरणीय वारशाचा अविभाज्य भाग आहे. या नदीचे पुनरुज्जीवन हे केवळ विकासाचे काम नसून, भावी पिढ्यांसाठी स्वच्छ आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. अमृत 2.0 अंतर्गत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी मिळाल्याने या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या प्रकल्पामुळे नदीचे प्रदूषण कमी होईल, जलगुणवत्तेत सुधारणा होईल, जैवविविधतेचे संवर्धन होईल आणि नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक नदीकिनारा उपलब्ध होईल. राज्य शासन, महापालिका आणि सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि निर्धारित मुदतीत पूर्ण व्हावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**


# मालमत्ता कर संकलनाचा पहिल्या तिमाहीतच ‘माईलस्टोन’..!

## 526 कोटी मालमत्ता कर जमा; 4 लाख 45 हजार 620 मालमत्ताधारकांनी घेतला कर सवलतींचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये कर वसुलीचा उच्चांकी ‘माईलस्टोन’ गाठला आहे. अवघ्या तीन महिन्यांत ५२६ कोटी १४ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात विभागाला यश आले आहे. ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता धारकांपैकी पहिल्या तिमाहीमध्येच ५९.८४ टक्के मालमत्ता धारकांनी कराचा भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. याबद्दल सर्व करदात्यांचे महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांनी आभार मानले आहेत.






पिंपरी चिंचवड शहरात सध्या निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक व इतर मिळून सुमारे ७ लाख ४४ हजार ६३० मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ४ लाख ४५ हजार ६२० मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. पहिल्या तिमाहित करभरणा-या नागरिकांची संख्या दरवर्षी वाढत आहे. नागरिकांनी मालमत्ताकर भरण्यासाठी करसंकलन विभागाने विविध उपाययोजना राबविल्या. त्याच्या माध्यमातून करदात्यांपर्यंत मालमत्ताकरावरील सवलतीबाबत विविध प्रकारे जनजागृती करण्यात आली. यामुळे नागरिकांना सवलतीबाबत माहिती होऊन नागरिकांनी पहिल्या तिमाहीमध्येच आपला मालमत्ताकर भरण्यासाठी प्राधान्य दिले आहे. सवलतीबाबत जनजागृती झाल्याने परिणामी, सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये एकूण मालमत्ताधारकांपैकी ४ लाख ४५ हजार ६२० मालमत्ताधारकांनी कर भरला असून त्यापैकी ३ लाख ४७ हजार ५६४ मालमत्ता धारकांनी ऑनलाइन स्वरूपात कर भरून सवलतींचा लाभ घेतला आहे. गतवर्षीप्रमाणे यावर्षीही पालिकेने राबविलेल्या महिला बचत गटामार्फत मालमत्ताधारकांना घरपोच बिलाचे वाटप केले, त्यामुळे नागरिकांनी ३० जूनपर्यंत महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वाधिक कराचा भरणा केल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

### असा आला मालमत्ता कर..

- ऑनलाइन – ४०७ कोटी ८९ लाख
- रोख – २१ कोटी ४७ लाख
- धनादेशाद्वारे – १६ कोटी २४ लाख
- डीडी – १५ कोटी ७५ लाख
- विविध ॲप- १० कोटी ४५ लाख

# पुण्यातील 70 हजारापेक्षा अधिक महिलांना मिळणार मिळकतकरात 50 टक्के सवलत!

## पुणे महापालिकेने शहरातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक अत्यंत मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीतील महिलांच्या नावावर असलेल्या पाचशे चौरस फुटांपर्यंतच्या सर्व निवासी मिळकतींना महापालिकेच्या मिळकतकरात ५० टक्के सवलत देण्याच्या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली. आता प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. यामुळे शहरातील महिला मिळकतदारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०-अ आणि १४०-ब अंतर्गत कर सवलतीसंबंधी तरतुदींचा आधार घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र, या योजनेची अंमलबजावणी काही अटी व शर्तींवर आधारित असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत शहरातील ज्या मिळकती महिलांच्या नावावर आहेत, त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

ज्या नागरिकांकडे १ एप्रिल २०२६ पूर्वीची थकबाकी, तसेच व्याज, दंड आणि शास्ती असेल, अशा मिळकतींना कोणतीही सवलत लागू होणार नाही. अनधिकृत मिळकतींवर लागू असलेली शास्ती कायम राहणार असून, संबंधित कलम २६७ (अ) अंतर्गत नियम लागू राहतील. तसेच, ज्या मिळकतींना सध्या महापालिकेची ४० टक्के सवलत लागू आहे, त्यांना ५० टक्क्यांऐवजी २५ टक्के सवलत देण्याचे यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीस प्रोत्साहन देणे आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. त्यासाठी स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी हा प्रस्ताव मांडला होता. स्थायी समितीचा अर्थसंकल्प तयार करताना भिमाले यांनी ही योजना प्रस्तावित केली. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर महापालिकेच्या मुख्य सभेची या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने आता अंतिम मंजुरीसाठी हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला जाणार असून, शासनाच्या मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.




### ७० हजारांहून अधिक महिलांना लाभ

» महापालिकेच्या नोंदीनुसार शहरात महिलांच्या नावावर सुमारे ७० हजार ७७३ निवासी मिळकती आहेत. या मिळकतींकडून महापालिकेला दरवर्षी सुमारे ४०.४८ कोटी रुपयांचा मिळकतकर प्राप्त होतो. प्रस्तावित ५० टक्के सवलतीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात अंदाजे २० कोटी रुपयांची घट होणार असली, तरी महिला सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मांडलेल्या या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्याने आता राज्य शासनाच्या अंतिम मंजुरीनंतर शहरातील महिला मिळकतदारांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.

### महिलांना मिळकतकरात ५०% सवलत

» पुणे महापालिकेच्या हद्दीतील महिलांच्या नावावर असलेल्या ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मिळकतींना मिळकतकरात ५० टक्के सवलत देण्याच्या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. आता हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असून, शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी सुरू होईल. या निर्णयामुळे शहरातील हजारो महिला मिळकतदारांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे हा या महत्त्वपूर्ण निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

### कोणाला मिळणार सवलतीचा लाभ?

» या योजनेचा लाभ ३१ मार्च २०२५ पर्यंत महिलांच्या नावावर नोंद असलेल्या निवासी मिळकतींनाच मिळणार आहे. मात्र, १ एप्रिल २०२६ पूर्वीची थकबाकी, व्याज, दंड किंवा शास्ती असलेल्या मिळकतींना या सवलतीचा लाभ मिळणार नाही. तसेच अनधिकृत मिळकतींवरील दंडात्मक तरतुदी कायम राहतील. ज्या मिळकतींना सध्या ४० टक्के करसवलत मिळत आहे, त्यांना प्रस्तावानुसार ५० टक्क्यांऐवजी २५ टक्के अतिरिक्त सवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी थकबाकी वेळेत भरून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# स्मार्ट मीटरची सक्ती आहे की नाही? अखेर महावितरणने केला मोठा खुलासा!

## वीज ग्राहकांसाठी महावितरणने एक अत्यंत महत्त्वाची स्पष्टोक्ती दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरची सक्ती नसल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.'प्री-पेड मीटर'बसविण्यात येत नाहीत आणि 'पोस्ट पेड' स्मार्ट मीटरचीही सक्ती नसल्याची माहिती महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी'लोकसत्ता'ला दिली.

राज्यात आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. तर, पुणे विभागात १४ लाख ७२ हजार स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रीडिंग घेता येत असल्याचा दावा महावितरणकडून करण्यात आला आहे.



'स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल ॲपवर दर तासाचा वीज वापर समजतो. त्यामुळे वीजदेयकाबाबत पारदर्शिता येते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. घरात किंवा कार्यालयात वीजगळती होत असल्यास समजते. तसेच ग्राहकाने कोणत्या वेळेला, किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते,' असे महावितरणकडून निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे. नव्या स्मार्ट मीटरच्या तंत्रामध्ये आधीच्या मीटरपेक्षा फार मोठे बदल नाहीत. ऑनलाईन माहिती अद्ययावत करण्यासाठी या मीटरला केवळ सीमकार्ड बसविण्यात आले आहे. हे मीटर पूर्वीपेक्षा अधिक अचूक, अधिक सुरक्षित आहेत.

### ग्राहक पंचायत काय म्हणते?

» दरम्यान, स्मार्ट मीटरमुळेच वीजदर वाढत असल्याचे दावे करण्यात येतात. प्रत्यक्षात मात्र असे वीजग्राहक अधिकृत तक्रार करत नसल्याचे निरीक्षण ग्राहक पंचायतीकडून नोंदविण्यात आले. 'सध्या स्मार्ट मीटरमुळे वीजदेयके वाढत असल्याचे दावे केले जातात. प्रत्यक्षात मात्र ग्राहकांकडून अधिकृत तक्रारी येत नाहीत. स्मार्ट मीटरचे फायदे आहेत. मात्र, त्याची अंमलबजावणी करताना अधिक स्पष्टता येण्याची गरज आहे. हे मीटर तपासण्याची सोय आहे का, त्याचे प्रमाणपत्र जाहीर करण्यात यावे आणि स्मार्ट मीटर मीटरबाबत ग्राहकांचा संभ्रम दूर व्हावा म्हणून अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे,' असे अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पुणे महानगर अध्यक्ष विलास लेले यांनी सांगितले.

# पालखी सोहळ्यादरम्यान वाहतूक पर्यायी मार्गाने

## 11 ते 18 जुलै या काळात वाहतुकीत बदल; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

जेजुरी: श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे ८ जुलै रोजी श्रीक्षेत्र आळंदी येथून प्रस्थान होणार आहे. याद्दष्टीने ग्रामीण हद्दीत पालखी प्रस्थान सोहळा बंदोबस्त ११ ते १५ जुलै या कालावधीत राहणार आहे. पालखी मार्गावरील वाहतुकीमध्ये बदल करून ती पर्यायी मार्गाने वळविण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिला आहे.

पुणे ते सासवड (सासवड मुक्काम) : ११ जुलै रोजी पहाटे २ वाजल्यापासून ते १३ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणेकडून सासवडकडे दिवेघाट व बोपदेव घाटमार्गे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. या मार्गावरील वाहने खडीमशिन चौक-कात्रज-कापूरहोळमार्गे जातील. सासवडकडून पुणे बाजुकडे येणारी वाहतूक गराडे-खेड-शिवापूरमार्गे वळविण्यात येणार आहे.

सासवड ते जेजुरी (जेजुरी मुक्काम) आणि जेजुरी ते वाल्हे (वाल्हे मुक्काम) : १३ जुलै रोजी पहाटे २ वा. पासून ते १४ जुलै राजी १२ वा. पुणे येथून सासवड-जेजूरी-वाल्हे-निराकडे तसेच निरा येथून पुणेकडे जाणाऱ्या वाहनांनी झेंडेवाडी-पारगाव मेमाणे-सुपे-मोरगाव-निरा या मार्गाचा वापर करावा.

वाल्हे ते लोणंद (लोणंद मुक्काम) : १५ रोजी पहाटे २ वा पासून ते १५ रोजीचे सायं ५ वा. पर्यंत पुणे येथून सासवड-जेजुरी-वाल्हे-निराकडे तसेच निरा येथून पुणेकडे जाणाऱ्या वाहनांनी सासवड-जेजुरी-मोरगाव या पर्यायी मार्गाचा वापर वापर करावा.

लोणंद येथून पुढे फलटणमार्गे : १५ ते १८ जुलै या कालावधीत फलटण-लोणंद येथून पुणे येथे येणारी वाहने शिरवळमार्गे पुणेकडे येतील. तसेच, पुणे येथून फलटण व लोणंदकडेजाणारी वाहने शिरवळमार्गे जातील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन डुडी यांनी केले.



### लोणंद-फलटण वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग

» १५ ते १८ जुलैदरम्यान लोणंद आणि फलटण परिसरातील वाहतुकीसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. फलटण व लोणंद येथून पुण्याकडे येणारी सर्व वाहने शिरवळ मार्गे वळविण्यात येतील. तसेच पुण्याहून फलटण आणि लोणंदकडे जाणाऱ्या वाहनांनाही शिरवळमार्गेच प्रवास करावा लागणार आहे. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने वाहतुकीचे सविस्तर नियोजन केले असून नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी, प्रवासाचे नियोजन करूनच घराबाहेर पडावे आणि जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दिवेघाट व बोपदेव घाट मार्ग बंद

» 'पालखी सोहळ्यानिमित्त ११ ते १३ जुलैदरम्यान पुणे ते सासवड या मार्गावरील दिवेघाट आणि बोपदेव घाट मार्गे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. पुण्याकडून सासवडकडे जाणाऱ्या वाहनांसाठी खडीमशिन चौक–कात्रज–कापूरहोळ हा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. तर सासवडहून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांना गराडे–खेड–शिवापूर मार्गाचा वापर करावा लागणार आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसह वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून वाहनचालकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जेजुरी-वाल्हे मार्गासाठी विशेष नियोजन

» '१३ आणि १४ जुलै रोजी सासवड–जेजुरी–वाल्हे–निरा मार्गावरील वाहतुकीतही मोठे बदल करण्यात आले आहेत. पुणे तसेच निरा येथून ये-जा करणाऱ्या वाहनांना झेंडेवाडी–पारगाव मेमाणे–सुपे–मोरगाव–निरा या पर्यायी मार्गाचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पालखी मार्गावर वारकऱ्यांची मोठी गर्दी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. वाहतूक कोंडी टाळणे, अपघात रोखणे आणि पालखी सोहळा निर्विघ्न पार पाडणे हा या नियोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# धरणसाखळीतील पाणीसाठ्यात किंचितशी वाढ; यंदाच्या पावसाळ्यात प्रथम भर

## पावसामुळे धरणसाठ्यात 0.02 टीएमसीची किंचितशी भर पडली, खडकवासला प्रकल्पात सध्या 12.45 टक्के साठा शिल्लक

**पुणे | प्रतिनिधी**


जून महिना संपला, तरी खडकवासला धरणसाखळीतील चारही धरण क्षेत्रांत अद्याप जोरदार पाऊस पडला नाही. मात्र, गेल्या आठवड्यात आणि सोमवारी (दि. २९) रात्री परिसरात पडलेल्या पावसामुळे धरणसाठ्यात ०.०२ टीएमसीची किंचितशी भर पडली आहे. यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.

धरणसाखळीत मंगळवारी सायंकाळी पाच वाजता ३.६३ टीएमसी (१२.४५ टक्के) इतका पाणीसाठा शिल्लक होता. दिवसभरात पानशेत येथे ३, वरसगाव येथे ४ व टेमघर येथे ८ मिलिमीटर पाऊस पडला. खडकवासला धरणमाथ्यावर पावसाची नोंद झाली नाही. गतवर्षी ३० जून २०२५ रोजी धरणसाखळीत १४.३३ टीएमसी इतका पाणीसाठा (४९.१५ टक्के) झाला होता.

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील माणगाव, दापसरे, कुर्तवडी तव, धामणगाव ओहळसह पानशेत-वरसगाव धरणक्षेत्रात सोमवारी (दि. २९) रात्रीपासून मंगळवारी पहाटे साडेपाच वाजेपर्यंत चांगला पाऊस पडला. तसेच, गेल्या आठवड्यात देखील धरण क्षेत्रात पाऊस झाला होता. यामुळे मंगळवारी धरणसाठ्यात ०.०२ टीएमसीची किंचित भर पडली. सध्या परिसरात पावसाने उघडीप दिली आहे.

पुणे शहर व परिसराला पिण्यासाठी खडकवासला धरणातून जवळपास ५०० क्सुसेक पाणी सोडले जात आहे. त्यामुळे धरणसाठ्यात घट सुरू आहे. पानशेत धरणातून ६१९ क्सुसेक पाणी खडकवासला धरणात सोडले जात आहे. त्यामुळे पानशेतमध्ये देखील घट सुरू आहे. वरसगावमधून पाणी सोडले जात नसल्याने या धरणात किंचित भर पडत आहे. टेमघर अद्यापही शून्यपातळीवर आहे.

पानशेत खोऱ्यातील माणगाव येथील शेतकरी विशाल सांगळे म्हणाले की, सोमवारी रात्रीपासून जोरदार पाऊस पडला. त्यामुळे ओढे दुथडी भरून वाहू लागले. मात्र, मंगळवारी सकाळपासून पाऊस कमी झाल्याने ओढ्याचे पाणी कमी झाले आहे.



### गेल्या दहा वर्षांत सर्वांत कमी पाऊस

» जून महिना संपला, तरी धरणक्षेत्रात जोरदार पाऊस पडला नाही. खडकवासला धरणसाखळीने अल्पसाठा पातळी गाठली आहे. त्यामुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. यंदाच्या पावसाळ्यात १ जून ते ३० जून या काळात पानशेत व टेमघर येथे सर्वाधिक प्रत्येकी १०२ मिलिमीटर पाऊस पडला. तर, याच कालावधीत खडकवासला ८७ व वरसगाव येथे ९८ मिलिमीटर पाऊस पडला. जून महिन्यात गेल्या दहा वर्षांत धरणक्षेत्रात प्रथमच अल्प पाऊस पडला आहे.